# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:25.05.2024** **वारःशनिवार**

---

1. विधान परिषदेच्या चार जागांच्या निवडणुकीसाठी नव्यानं कार्यक्रम जाहीर, येत्या 26 जूनला मतदान
2. लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 146 व्या तुकडीचं दिमाखदार दीक्षांत संचलन
3. पुण्याच्या एफटीआयआयच्या विद्यार्थ्यांना कान्स चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट लघुपटाचा 'सिनेफ' पुरस्कार
4. डोंबिवली स्फोटातील मृतांची संख्या 13वर, कारखान्याच्या मालकांना अटक
5. कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन मुलाच्या वडिलांसह सहा जणांना 7 जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी; येरवडा पोलीस ठाण्यातील दोन कर्मचारी निलंबित आणि
6. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि रोहिणी हट्टंगडी यांना जाहीर

**विधान परिषद निवडणूक**

राज्यात मुंबई आणि कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ तर नाशिक आणि मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघ अशा विधान परिषदेच्या चार जागांसाठी येत्या 26 जून रोजी मतदान होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं काल या निवडणुकीसाठी नव्यानं कार्यक्रम जाहीर केला. यासाठी 31 मे रोजी अधिसूचना जारी होईल, 7 जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, 10 जूनला अर्जांची छाननी होईल, तर 12 जून ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असेल. चारही मतदारसंघांसाठी 26 जूनला मतदान आणि 1 जुलैला मतमोजणी होणार आहे.

**निवडणूक**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात आज देशातील 7 राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात मिळून 58 जागांवर मतदान होत आहे. जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग-राजौरी मतदारसंघातील तिसऱ्या टप्प्यात पुढे ढकलण्यात आलेली निवडणुकही आज सहाव्या टप्प्यात होत आहे. या टप्प्यात 889 उमेदवार निवडणूक लढवत आहेत. लोकसभेच्या 543 जागांपैकी पाचव्या टप्प्यापर्यंत 429 जागांवर मतदान झालं आहे. सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात 56 जागांवर 1 जून रोजी मतदान होणार आहे.

**एनडीए**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 146 व्या तुकडीचा दिमाखदार दीक्षांत संचलन सोहळा लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत काल पुण्यात पार पडला. या संचलनात महिला छात्रांच्या तुकडीचाही समावेश होता. संचलनात महिला छात्रांच्या सहभागाबद्दल जनरल पांडे यांनी त्यांचं अभिनंदन केलं. या देशात आता संरक्षण क्षेत्रात नारीशक्तीचं मजबूत स्थान असल्याचं ते म्हणाले. आधुनिक काळात युद्धाचं स्वरूप बदलत आहे; पारंपरिक युद्धात आता तंत्रज्ञान, अंतराळ आणि माहिती तंत्रज्ञानाचाही समावेश झाला आहे. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम

बुद्धिमत्तेबाबत अद्ययावत असलं पाहिजे, अशी अपेक्षा जनरल पांडे यांनी व्यक्त केली. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 146 व्या दीक्षांत संचलन सोहळ्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून........

**तीन वर्षाच्या खडतर प्रशिक्षणानंतर राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 146 तुकडीचे छात्र भारतीय सैन्यात दाखल होण्यास सज्ज झाले. यासाठी दीक्षांत संचालन सोहळा हा महत्त्वाचा असतो. या दिमाखदार सोहळ्याला हम nda के कॅडेट है या गीताने सुरुवात झाली. सोहळ्याचे प्रमुख पाहुणे जनरल मनोज पांडे यांनी संचलनाची पाहणी केली. त्यानंतर छात्रांच्या तालबद्ध आणि दिमाखदार संचलनाला सुरुवात झाली. या संचलन सोहळ्याला हवाई दलाच्या चेतक हेलिकॉप्टर्स, सुपर डिमोना आणि सुखोई विमानांनी सलामी दिली. मनोज पांडे यांच्या हस्ते शोभित गुप्ता याला सुवर्णपदक माणिक तुरंत याला रौप्य पदक तर अनी नेहरा याला कास्यपदक देऊन गौरवण्यात आलं आणि मानाचा चीफ ऑफ स्टाफ बॅनर गोल्फही देण्यात आला. 146 व्या तुकडीत 337 छात्र सहभागी होते त्यापैकी 199 लष्करात, 38 नौदलात आणि 100 हवाई दलात दाखल होणार आहेत. यामध्ये 19 मित्र देशांच्या छात्रांचाही सहभाग होता. तर 24 महिला छात्रांचाही संचलनात सहभाग होता. आकाशवाणी बातम्यांसाठी श्रद्धा वार्डे, पुणे**.

**<u>FTII</u>**

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था- एफटीआयआयच्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या चित्रपटाला 77व्या कान्स चित्रपट महोत्सवातल्या 'सिनेफ' पुरस्कारामध्ये सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार मिळाला आहे. जगभरातून आलेल्या 2 हजार 263 प्रवेशिकांमधून 18 चित्रपटांची निवड करण्यात आली होती.  FTII चा विद्यार्थी, चिदानंद नाईक याने दिग्दर्शित केलेल्या "Sunflowers were the first ones to know" या चित्रपटाला हा पुरस्कार मिळाला. हा चित्रपट कन्नड लोककथेवर आधारित आहे. FTII च्या दूरचित्रवाणी गटाच्या सुरज ठाकूर यांनी या चित्रपटासाठी कॅमेरा संयोजन, मनोज व्ही यांनी संपादन तर ध्वनी संयोजन अभिषेक कदम यांनी केलं.

**<u>डोंबिवली</u>**

डोंबिवली औद्योगिक वसाहतीमधील रसायनाच्या कारखान्यात गुरुवारी झालेल्या भीषण स्फोटातील मृतांची संख्या 13 झाली आहे. काल दुसऱ्या दिवशीही अग्निशमन दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाकडून शोधकार्य सुरु होतं. या घटनेत 60 पेक्षा जास्त व्यक्ती जखमी झाल्या असून अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री मदत निधीतून पाच लाख रुपयांची मदत केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. एमआयडीसीमधील अमुदान या रसायन कारखान्यात गुरुवारी दुपारी बॉयलरचा भीषण स्फोट झाला होता. या प्रकरणी प्रमुख आरोपी कारखान्याच्या मालक मालती प्रदीप मेहता आणि मलय मेहता यांना काल ठाणे पोलिसांनी नाशिकमधून अटक केली आहे. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<u>पोर्शे</u>**

पुण्यातील कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अगरवाल यांच्यासह सहा जणांना सात जूनपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. पी. पोंक्षे यांनी काल दिले. या सहा जणांची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. विशाल अगरवाल यांच्यासह बारमालक, व्यवस्थापक आणि अन्य कर्मचाऱ्यांच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्याने त्यांना काल न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. अल्पवयीन मुलाला आधीच बाल सुधारगृहात पाठवण्यात आलं आहे. विशाल अगरवालवर पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करणं, आणि पोर्शे कारची नोंदणी झालेली नसताना, नोंद झाल्याची खोटी माहिती देणं, असे आणखी दोन गुन्हे दाखल

करण्यात येणार आहेत. दरम्यान या प्रकरणी पुणे पोलीस आयुक्तांनी येरवडा पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक राहुल जगदाळे आणि विश्वनाथ तोडकरी 2 कर्मचाऱ्यांना निलंबित केलं आहे. तपासात दिरंगाई आणि अपघाताची माहिती वेळेत वरिष्ठांना न दिल्याचा ठपका ठेवत या दोघांचं निलंबन करण्यात आलं आहे.

**<u>पुरस्कार</u>**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना जाहीर करण्यात आला आहे. मुंबईच्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीनं दरवर्षी 14 जूनला गो. ब. देवल पुरस्कार समारंभाचं आयोजन करण्यात येतं. गेल्या तीन वर्षांपासून पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं नव्हतं. यंदा माटुंगा इथल्या यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुलात 14 जून रोजी सर्व पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली आहे.

**<u>प्राणी गणना-कोल्हापूर, सोलापूर</u>**

कोल्हापूर वन्यजीव विभागानं बुध्द पौणिमेच्या रात्री राधानगरी अभयारण्यामध्ये प्राणीगणनेचा कार्यक्रम आयोजित केला होता. वन विभागाचे 50 अधिकारी, कर्मचारी आणि 26 स्वयंसेवकांनी यात सहभाग नोंदवला, अशी माहिती विभागीय वन अधिकारी एस एस. पवार यांनी दिली. सोलापुरातल्या नान्नज अभयारण्यातही वन्यप्राणी गणना करण्यात आली. या गणनेत सोलापूरची ओळख असलेला माळढोक पक्षी आढळला. माळढोक सोबतच कुदळ्या पक्षी दिसला असून नीलगायींच्या संख्येतही वाढ झाली आहे. लांडगा, मुंगुस, ससा, सायाळ, घोरपड यांची संख्या कमी दिसली. तर खोकड, रानमांजर, रानडुक्कर, कोल्हा, मोर, निलगाय आणि काळवीट यांच्या संख्येत वाढ झाल्याचं आढळून आलं आहे. गणनेत 14 प्रकारचे प्राणी आणि पक्षी आढळले.

**<u>निधन-नागपूर</u>**

विको कंपनीचे अध्यक्ष यशवंतराव पेंढरकर यांचं काल नागपूरमध्ये निधन झालं. ते 85 वर्षांचे होते. 2016 पासून त्यांनी विको कंपनीच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. त्यांच्या नेतृत्वात कंपनीने कालसुसंगत बदल स्वीकारत प्रगतीचे नवनवीन टप्पे गाठले. त्यांच्या पार्थिव देहावर आज अंबाझरी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

**<u>हवामान</u>**

दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडेल. अन्यत्र ढगाळ हवामान राहील. विदर्भात उष्णतेची तीव्र लाट कायम Eआहे. अकोला इथं सर्वाधिक 45 पूर्णांक 5 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. विदर्भात आज तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह पावसाचा इशाराही हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.